दै. लोकमत दि. 01/09/2022

दै. लोकमत दि. 01/09/2022

### तीन मोबाइल शॉपी फोडून ५२ मोबाइल केले होते लंपास

# चोरीतील मोबाइलचा वापर केल्यामुळे टोळीचे बिंग फुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड/लोहा :** लोहा शहरात ५ एप्रिल रोजी तीन मोबाइल शॉपी आणि एसबीआयचे ग्राहक सेवा केंद्र फोडून चोरट्यांच्या टोळीने ५१ मोबाइलसह तब्बल दहा लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. तब्बल चार महिन्यांनंतर या टोळीतील एकाने चोरीतीलच मोबाइलचा वापर केला. त्यामुळे लोकेशन काढून स्थानिक गुन्हे शाखा आणि लोहा पोलिसांनी उत्तर प्रदेशच्या मेरठ येथून एकाला बेड्या ठोकल्या आहेत.

५ एप्रिलच्या रात्री लोहा शहरातील बसस्टॅण्ड कॉम्प्लेक्समध्ये असलेली हनुमंत बळवंत लांडगे यांच्या मालकीची बालाजी मोबाइल शॉपी फोडण्यात आली होती. तसेच तुळशीराम रंगनाथ जोरुळेंची श्री साई मोबाइल गॅलरी, एसबीआयचे ग्राहक सेवा केंद्र, अजीज गुलाम हुसेन कुरैशी यांची अनुप कुमार मोबाइल शॉप तिघांनी फोडली होती. यावेळी ५२ मोबाइल, १० नग ब्ल्यू टूथ, हेड फोन, रोख एक लाख ७० हजार रुपये असा एकूण दहा लाख तीन हजार रुपयांचा माल लंपास केला होता. या प्रकरणात लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. गेल्या चार महिन्यांपासून पोलीस या टोळीच्या मागावर होते. परंतु सुगावा लागत नव्हता. त्यातच टोळीतील एका चोरट्याने चोरीतील मोबाइल वापरला. अन् पोलिसांना त्याचा सुगावा लागला. पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलीस अधीक्षक नीलेश मोरे, उपाधीक्षक मारोती थोरात, पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, संतोष तांबळे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने उत्तर प्रदेशातील मेरठ गाठले. या ठिकाणाहून मोहम्मद रशीद मुशाहिद चौधरी याला अटक केली. त्याच्या घरातून चोरीतील २१ मोबाइल जप्त करण्यात आले, तर इतर दोन आरोपींचा शोध सुरू आहे.

### चोरी नांदेडात, मौजमजा उत्तर प्रदेशात

उत्तर प्रदेशातील चोरट्यांच्या टोळ्या चोरीसाठी नांदेड जिल्ह्यात येत आहेत. मोबाइल चोरट्यांची ही टोळीही नांदेड जिल्ह्यात चोरी केल्यानंतर उत्तर प्रदेशात आपल्या गावी जाऊन मौजमजा करतात. त्यातील एक पोलिसाच्या हाती लागला असून, दोघांचा शोध सुरु आहे.

UPSC
MPSC
मोफत बॅचेस्
प्रवेश परीक्षा क्र.2
दि.7 सप्टेंबर 2022
नाव नोंदणी आवश्यक !
गुट्टे अकॅडमी
Since 2009 श्रीनगर नांदेड
संपर्क : 8888004217